संगणक सांकेतांक-

असा. क्र. २ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००८-०९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी २, २००९/पौष १२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-ल

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २ जानेवारी २००९

### अधिसूचना

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्र. किवेअ. ८२००८/प्र.क्र. ८६३/कामगार-७.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही " चित्रपट प्रदर्शन करण्याच्या उद्योगातील कामधंदा " यातील रोजगारात असलेल्या (यांत यापुढे ज्याचा " उक्त अनुसूचित रोजगार " असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. एमडब्ल्युए २६८३/५४४८/कामगार-७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ अन्वये पुनर्निर्धारीत केले आहेत ;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने पुनर्विलोकन करून उक्त अनुसूचित रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारीत करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी, आता किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा अकरा) हा महाराष्ट्र राज्यात लागू करताना त्याच्या कलम ३, च्या पोट-कलम (१) चा खंड (ब) आणि कलम ५ चे पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात

आलेल्या अधिकारांचा वापर करून शासकीय अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक १२२००४/सीआर-४७४/कामगार-७, दिनांक २८ जानेवारी २००५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर आणि सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घे.त्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे, दिनांक २ जानेवारी २००९ पासून उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या या सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ क्रमांक (२) मध्ये नमुद केलेल्या कामगारांच्या वर्गाला त्या अनुसूचीच्या स्तंभ क्रमांक (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान दर निश्चित करीत आहे.

## अनुसूची

| अ. क्र. (१) | कामगारांची वर्गवारी (२) | किमान वेतन दर (दरमहा रुपये) (३) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मल्टीप्लेक्स | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ | टूरींग टॉकीज |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| १ | कुशल | ५५००.०० | ५०००.०० | ४५००.०० | ४०००.०० |
| २ | अर्धकुशल | ५०००.०० | ४५००.०० | ४०००.०० | ३५००.०० |
| ३ | अकुशल | ४५००.०० | ४०००.०० | ३५००.०० | ३०००.०० |

**स्पष्टीकरण.**—या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ—

(ए) **मल्टीप्लेक्स.**—ज्यात एकापेक्षा जास्त स्क्रिनची व्यवस्था आहे अशी कोणत्याही परिमंडळातील ठिकाणी कार्यरत असलेली सर्व मल्टीप्लेक्स थिएटर्स यामध्ये समाविष्ट होतील.

(बी) **परिमंडळ एक.**—सर्व महानगरपालिका क्षेत्र तसेच 'अ' वर्ग आणि 'ब' वर्ग नगरपरिषद क्षेत्रांचा समावेश या परिमंडळात होईल.

(सी) **परिमंडळ दोन.**—'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्र व इतर उर्वरीत क्षेत्राचा समावेश या परिमंडळात होईल.

(डी) **टूरींग टॉकीज.**—कोणत्याही परिमंडळात चित्रपट प्रदर्शित करणाऱ्या सर्व टूरींग टॉकीजचा समावेश होईल.

(इ) रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांस देय असलेले मजुरीचे किमान दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात करून काढण्यात येईल.

(एफ) किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल.

(जी) किमान वेतन दरामध्ये मूळ दर, विशेष भत्ता आणि सवलती असल्यास, त्यांचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या सर्व दरांचा समावेश असेल.

(एच) मल्टीप्लेक्स थिएटर टूरींग टॉकीज कोणत्याही परिमंडळामध्ये असले तरी मल्टीप्लेक्स थिएटर किंवा टूरींग टॉकीज यामध्ये काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतनाचे दर अनुसूचिच्या स्तंभ क्रमांक ३ मध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

(आय) एखादा कुशल कामगार म्हणजे जो स्वत:च्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो असा कामगार.

(जे) अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरुपाचे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की ज्यामध्ये महत्त्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्यरितीने पार पाडण्याची आवश्यकता असते. मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते.

(के) अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पुर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे. असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार म्हणून त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळ्या वस्तुंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

## परिशिष्ट

महाराष्ट्रातील राज्यातील दहा केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवी मालिका १९८२=१००) हा उक्त अनुसूचीत रोजगारात नोकरीत असलेल्या कामगारांना लागू असलेला राहणीमान निर्देशांक असेल. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी १ जानेवारी आणि १ जुलै रोजी होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर, त्या सहा महिन्यांसाठी उक्त कामगारांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढेल आणि ६१९ निर्देशांकावर अशा प्रत्येक अंकाच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात अशी सरासरी काढण्यात आलेली असेल त्या सहा महिन्यालगत पुढील सहामाहीसाठी उक्त कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता (यात यानंतर ज्याचा " राहणीमान भत्ता " असा निदेश करण्यात आलेला आहे) सर्व परिमंडळाच्या संबंधित दरमहा रुपये ४.६१ या दराने असेल.

२. सक्षम प्राधिकारी, शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उपरोक्तप्रमाणे हिशोब करून काढलेला राहणीमान भत्ता जेव्हा जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये आणि जेव्हा जुलै ते डिसेंबर या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये जाहीर करील :

परंतु, सक्षम प्राधिकारी, किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता जून किंवा डिसेंबर अखेरपर्यंत किंवा यथास्थिती, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बा. शि. वानखेडे,**
शासनाचे उप सचिव.